
## कोण असतील भारताचे सुवर्णपदकाचे प्रबळ दावेदार!

### नीरज चोप्रा (भालाफेक)



भारताच्या ३२ सदस्यीय ॲथलेटिक्स संघाचे नेतृत्व ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्राकडे असेल. तळपाठीच्या दुखापतीतून सावरून त्याने दोहा डायमंड लीगमध्ये ८५.६९ मीटर थ्रो करत पुनरागमन केले आहे. २०१८ च्या गोल्ड कोस्ट स्पर्धेत सुवर्ण जिंकणाऱ्या नीरजला गेल्या वेळी बर्मिंगहॅम स्पर्धेत खेळता आले नव्हते. यंदा तो पुन्हा सुवर्णवेध घेण्यासाठी सज्ज आहे.

### मिराबाई चानू (वेटलिफ्टिंग)



३१ वर्षीय स्टार वेटलिफ्टर मिराबाई चानू उद्घाटन सोहळ्याच्या संचलनात तिरंगा फडकवत भारतीय पथकाचे नेतृत्व करेल. ४८ किलो वजनी गटात खेळणारी मिराबाई दोन वेळची राष्ट्रकुल चॅम्पियन (२०१८ आणि २०२२ सुवर्णपदक) असून, यंदा पदकांची सुवर्ण 'हॅट्ट्रिक' करण्यासाठी ती सर्वात मोठी दावेदार आहे.

### लव्हलिना बोर्गोहेन (बॉक्सिंग)



टोकियो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती आणि माजी जागतिक चॅम्पियन लव्हलिना बोर्गोहेन (७५ किलो वजनी गट) यंदा आपले पहिले राष्ट्रकुल पदक जिंकण्यासाठी उत्सुक आहे. गेल्या दोन राष्ट्रकुल स्पर्धेत पदकापासून दूर राहिलेल्या २८ वर्षीय लव्हलिनाकडून यंदा देशाला 'गोल्डन पंच'ची आशा आहे.

### मुरली श्रीशंकर (लांब उडी)



बर्मिंगहॅममधील रौप्यपदक विजेत्या मुरली श्रीशंकरने भुवनेश्वर येथील आंतर-राज्य अजिंक्यपद स्पर्धेत ८.३८ मीटर उडी मारून आपल्या सर्वोत्तम कामगिरीची बरोबरी केली आहे. त्याची सध्याची फॉर्मात असलेली कामगिरी भारताला सुवर्णपदक जिंकवून देऊ शकते.

### लॉन बॉल्स संघ (महिला आणि पुरुष संघ)

गेल्या वेळी बर्मिंगहॅममध्ये महिला संघाने ऐतिहासिक सुवर्ण आणि पुरुष संघाने रौप्यपदक जिंकून चमत्कार केला होता. यंदाही या खेळाडूंकडून त्याच ऐतिहासिक कामगिरीची पुनरावृत्ती अपेक्षित आहे.

**भारताचे खेळनिहाय पथक**

- **ॲथलेटिक्स/पॅरा-ॲथलेटिक्स :** ३२ खेळाडू
- **बॉक्सिंग :** १२ खेळाडू
- **वेटलिफ्टिंग/पॅरापॉवरलिफ्टिंग :** ११ खेळाडू
- **लॉन बॉल्स :** १० खेळाडू
- **ज्युडो :** ६ खेळाडू
- **सायकलिंग (ट्रॅक सायकलिंग) :** ३ खेळाडू
- **स्वीमिंग आणि पॅरास्वीमिंग :** २ खेळाडू

**प्रशिक्षक आणि अधिकृत सपोर्ट स्टाफ** ५० सदस्य

**एकूण पथक** १२६ सदस्य

## ७४ देशांतील ३ हजारांहून अधिक खेळाडू नशीब आजमावणार

# ग्लास्गो राष्ट्रकुल स्पर्धा आजपासून

### ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंगवर भारताची मदार

commonwealth games GLASGOW 2026

### नीरज चोप्रा, मिराबाई चानू सुवर्णपदकासाठी सज्ज

● **थेट प्रक्षेपण** ●
सोनी स्पोर्टस् नेटवर्क, दूरदर्शन स्पोर्टस्
● **डिजिटल स्ट्रीमिंग :** सोनी लिव्ह

**ग्लास्गो : वृत्तसंस्था**

क्रीडा जगताचे लक्ष लागून राहिलेल्या २३ व्या राष्ट्रकुल खेळांचा थरार आजपासून (दि. २३) स्कॉटलंडमधील ग्लास्गो शहरात सुरू होत आहे. तब्बल ७४ देशांतील सुमारे ३ हजारांहून अधिक खेळाडू या क्रीडा महाकुंभातील १० विविध खेळांमध्ये आपले नशीब आजमावतील. भारतीय प्रमाणवेळेनुसार आज रात्री १०.३० वाजता 'ओव्हो हायड्रो' येथे होणाऱ्या दिमाखदार उद्घाटन सोहळ्याने या स्पर्धेचे बिगुल वाजणार आहे. त्यापूर्वी भारताच्या मोहिमेची सुरुवात आज दुपारी २.०० वाजल्यापासून 'लॉन बॉल्स'च्या सामन्याने होईल.



खर्च कपातीमुळे यंदा कुस्ती, नेमबाजी, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस यांसारख्या भारताच्या हक्काच्या खेळांना स्पर्धेतून वगळण्यात आले आहे. गेल्या २०२२ च्या बर्मिंगहॅम स्पर्धेत भारताने जिंकलेल्या ६१ पदकांपैकी २५ पदके याच चार खेळांतील होती. त्यामुळे यंदा भारताची संपूर्ण मदार प्रामुख्याने ॲथलेटिक्स, बॉक्सिंग आणि वेटलिफ्टिंग या तीन खेळांवर असेल. ॲथलेटिक्समध्ये भारताने सर्वाधिक ३२ खेळाडूंचे पथक उतरवले आहे. यंदाच्या मोहिमेत सुवर्णपदकासाठी नीरज चोप्रा व मिराबाई चानू यांच्यावर भारताची प्रामुख्याने भिस्त असेल.




### मागील 'राष्ट्रकुल'मध्ये भारताला ६१ पदके; यंदा निम्म्यावर येण्याची भीती!

ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्याने वाढत्या खर्चामुळे आयोजनातून माघार घेतल्याने, ग्लास्गोने अत्यंत कमी बजेटमध्ये ही स्पर्धा आयोजित केली आहे. मात्र, यासाठी मोठी छाटणी करण्यात आली असून, क्रीडा प्रकारांची संख्या १९ वरून थेट १० वर आणण्यात आली आहे. या क्रीडा कपातीचा सर्वाधिक फटका भारताला बसणार आहे. वगळण्यात आलेल्या ९ खेळांमध्ये भारताचे पारंपरिक वर्चस्व असलेले खेळ समाविष्ट आहेत.

२०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने ६१ पदके जिंकली होती. त्यापैकी तब्बल २८ पदके कुस्ती (६ सुवर्णांसह १२ पदके), बॅडमिंटन (६ पदके), टेबल टेनिस (७ पदके), हॉकी (२ पदके) आणि महिला क्रिकेट (१ पदक) या खेळांमधून आली होती. हे सर्व हक्काचे खेळ यंदा पूर्णपणे वगळण्यात आल्यामुळे भारताला यंदा ३० पदकांचा टप्पा ओलांडण्यासाठीही कमालीचा संघर्ष करावा लागणार आहे.

### सांगता समारंभात रश्मिका, शंकर महादेवन यांचा जलवा



यंदाच्या राष्ट्रकुल स्पर्धेचा सांगता समारंभ २ ऑगस्ट रोजी होणार असून, या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण बॉलीवूड अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि दिग्गज गायक-संगीतकार शंकर महादेवन हे असतील. या दिमाखदार सोहळ्यात भारताकडे अधिकृतपणे २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद सोपवले जाईल. २०३० ची राष्ट्रकुल स्पर्धा अहमदाबादमध्ये खेळवली जाणार आहे.



### 'ती' परंपरा अबाधित राहणार का?

गेल्या दोन दशकांपासून (२००२ मँचेस्टर गेम्सपासून) प्रत्येक राष्ट्रकुल स्पर्धेत पदतालिकेत अव्वल पाचमध्ये राहण्याचा भारताचा ऐतिहासिक रेकॉर्ड आहे. मात्र, यंदा भारताला ज्या खेळात अधिक पदके मिळतात, ते खेळच समाविष्ट नसल्याने हा रेकॉर्ड राखणे भारतासाठी 'अग्निपरीक्षा' ठरणार आहे.




## भारत-झिम्बाब्वे यांच्यात आज पहिली टी-२०

- श्रेयस अय्यरसमोर नेतृत्वगुण सिद्ध करण्याचे आव्हान
- १५ वर्षीय 'वंडर बॉय' वैभव सूर्यवंशीवर फोकस

**हरारे : वृत्तसंस्था**

आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत अनपेक्षित पराभवाचे धक्के पचवल्यानंतर, आता भारतीय क्रिकेट संघ झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत विजयाच्या ट्रॅकवर परतण्यासाठी सज्ज झाला आहे. हरारे स्पोर्टस् क्लबवर आयोजित या मालिकेतील आजचा पहिला सामना सायंकाळी ४.३० पासून खेळवला जाईल.

कर्णधार म्हणून खेळलेल्या पहिल्या सात सामन्यांपैकी सहा सामने गमावल्यानंतर श्रेयस अय्यरसाठी ही




मालिका स्वतःचे नेतृत्व सिद्ध करण्याची आणि ड्रेसिंग रूमचा गमावलेला आत्मविश्वास परत मिळवण्याची मोठी संधी असेल. अनुभवी संजू सॅमसनची या दौऱ्यासाठी निवड न झाल्यामुळे पंजाबचा धडाकेबाज फलंदाज अभिषेक शर्मा आणि अवघ्या १५ वर्षांचा डाव्या हाताचा युवा सनसनाटी फलंदाज वैभव सूर्यवंशी डावाची सुरुवात करतील हे आता स्पष्ट झाले आहे.

या दौऱ्यासाठी भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या अनुपस्थितीत राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांच्याकडे हंगामी मुख्य प्रशिक्षकपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. आक्रमक आणि सातत्याने प्रयोग करणाऱ्या गंभीर यांच्या तुलनेत लक्ष्मण यांची कार्यशाली संयमावर भर देणारी आहे. लक्ष्मण सहसा अंतिम अकरा खेळाडूंमध्ये जास्त फेरबदल करत नाहीत. त्यामुळे या मालिकेसाठी संघात स्थैर्य राखत विजय मिळवून देणे, हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट असेल.

**भारत — आजचा सामना — झिम्बाब्वे**
**स्थळ :** हरारे
**सामन्याची वेळ :** सायं. ४.३० वा.
**थेट प्रक्षेपण :** झी युनाईट-८ स्पोर्टस्

### शुभमन गिल दुसऱ्या क्रमांकावर

**दुबई : वृत्तसंस्था**

'आयसीसी'ने बुधवारी जाहीर केलेल्या ताज्या वन-डे मानांकनात भारतीय कर्णधार शुभमन गिलची अव्वल स्थानी पोहोचून तख्तापलट करण्याची सुवर्णसंधी थोडक्यात हुकली. सध्या गिल ८०१ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर कायम आहे. न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल ८०२ रेटिंगसह अव्वल स्थानी विराजमान आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर कायम असले, तरी या दोघांच्याही रेटिंगमध्ये वाढ झाली आहे. रोहित ७५८, तर कोहली ७६७ गुणांवर पोहोचले आहेत.

# जन्मदिवस साजरा करताना काळीज पिळवटून निघतंय!

### अजितदादांच्या आठवणीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावुक


**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

राज्याच्या राजकारणात नेतृत्वाची छाप निर्माण केलेले दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या. अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांनी त्यांच्या सहवासातील क्षण, कुटुंबावरील प्रेम आणि समाजासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. तसेच, जन्मदिवस साजरा करताना काळीज पिळवटून निघतंय! असेही त्यांनी म्हटले आहे.

सुनेत्रा पवार यांनी आपल्या संदेशात अजितदादांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, जनतेप्रति असलेली बांधिलकी आणि विकासासाठीची त्यांची अविरत धडपड यांचे स्मरण केले. 'तुम्ही आज आमच्यात नसला, तरी तुमच्या आठवणी, विचार आणि कार्याचा सुगंध कायम आमच्या मनात दरवळत राहील,' अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या.

ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच सामान्य नागरिकांनी प्रतिक्रिया देत अजितदादांना अभिवादन केले. अनेकांनी त्यांच्या कार्याची आठवण करून देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

अजितदादांच्या जयंतीनिमित्त सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केलेल्या भावना अनेकांच्या डोळ्यांत पाणी आणणाऱ्या ठरल्या. त्यांच्या पोस्टमधून अजितदादांविषयीचे प्रेम, आदर स्पष्टपणे व्यक्त झाल्याने ती सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली.



**बारामती : विद्या प्रतिष्ठानमधील स्मृतिस्थळी अभिवादन करताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार.**

**स्मृतिस्थळी अभिवादन**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार जयंतीदिनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार, जय पवार आणि पवार परिवाराकडून येथील अजितदादांच्या स्मृतिस्थळी अभिवादन करण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आले. हे औचित्य साधून भाजपने राज्यभर विविध कार्यक्रम आयोजित केले होते. भाजप प्रदेश कार्यालयातही रक्तदान शिबिर पार पडले.

देवेंद्र फडणवीस यांनी आपला वाढदिवस केवळ समाजपयोगी उपक्रमांद्वारे साजरा व्हावा, असे आवाहन केले होते. त्यानुसार राज्यभर आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिर अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रदेश भाजपाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते उदघाटन झाले. यावेळी नार्वेकर यांनी, शेतकऱ्यांना कर्ज आणि वीज बिल माफी देण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाची आजपासून अंमलबजावणी होत असून, त्याचा लाभ लाखो शेतकऱ्यांना होणार असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी स्वत: रक्तदान केले. भाजप प्रदेश कार्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत, सदाशिव चौधरी आदी यावेळी उपस्थित होते. राज्यभरातदेखील मुख्यमंत्री



फडणवीस यांच्या आवाहनानुसार आरोग्य आणि रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. त्याचा लाभ हजारो नागरिकांनी घेतला.

**विक्रमी ७८ हजार रक्तपिशव्या जमा, एशिया बुक रेकॉर्डमध्ये नोंद**

रक्तदानाच्या या समाजोपयोगी उपक्रमातून २२ जुलै या एका दिवशी संपूर्ण महाराष्ट्रातून ७८ हजार रक्त पिशव्या जमा झाल्या आहेत. हा एक विक्रम ठरला आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात एकाच दिवशी एवढ्या मोठ्या संख्येने रक्त जमा झाले नव्हते. यापूर्वी शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरातून २५ हजार रक्त पिशव्या जमा झाल्या होत्या.

### कर्जमुक्ती योजनेची पहिली यादी जाहीर

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पहिल्या जयंतीचे औचित्य साधत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६'अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी बुधवारी जाहीर केली. मात्र, या पहिल्या यादीत केवळ ५३३ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

**जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात)**
नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, 401-407, 4था मजला, डिवाईन चाईल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई महा. 400093 सीआयएन : L99999MH1992PLC066213
(कंपनी अवसायन प्रक्रियेत आहे पहा माननीय एनसीएलटी यांचा आदेश दिनांक नोव्हेंबर 26, 2024)

**ई-लिलावासाठी जाहीर घोषणा**
**नादारी आणि दिवाळखोरी संहिता, 2016 आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार सूचना**

खाली स्वाक्षरी करणारे हे सर्वसामान्य लोकांना इथे सूचना देत आहेत की जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (आवसायनात) (कॉर्पोरेट कर्जदार)च्या एका (1) मालमत्तेच्या (खाली दिलेल्या तक्त्यात वर्णन असलेल्या) विक्रीसाठी ई-लिलाव प्रस्ताव मागवण्यात येत आहेत, या मालमत्ता कॉर्पोरेट कर्जदाराच्या अवसायनातील संपत्तीचा नादारी आणि दिवाळखोरी संहिता, 2016 (आयबीसी) च्या तरतुदींनुसार तसेच त्याअंतर्गत नियम आणि रेग्युलेशन्सनुसार भाग असून 'जे आहे जिथे आहे,' 'जे आहे काय आहे,' 'जे काही आहे तेथे आहे' आणि 'कोणत्याही मदतीशिवाय' आधारावर आणि कोणतेही प्रतिनिधित्व, वॉरंटी किंवा नुकसानभरपाईशिवाय त्यांची विक्री होईल.

खाली स्वाक्षरी करणारे यांच्याद्वारे ही विक्री ई-लिलाव प्लॅटफॉर्म बांकनेट (पूर्वीचे ईबिक्रे)च्या माध्यमातून https://ibbi.baanknet.com (**ई-लिलाव प्लॅटफॉर्म**) आयबीबीआय (दिवाळखोरी प्रक्रिया) नियम, 2016 चा नियम 32 आणि मालमत्ता विक्री प्रक्रिया करार **दिनांक जुलै 20, 2026 (एएसपीएम)** नुसार होणार आहे. सर्व इच्छुक बिडर्सना विनंती आहे की त्यांनी सर्व पात्रता निकष दस्तावेज आणि बयाणा रक्कम हे संबंधित एएसपीएम्सच्या कलम 4 (पात्रता निकष दस्तावेज) मध्ये नमूद करण्यात आलेल्या दस्तावेज प्रस्तुती नियमांनुसार अनिवार्यपणे आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच प्रस्तुत करावेत.

**ई-लिलावाच्या महत्वाच्या दिनांकांचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| पात्रता निकष दस्तावेज आणि कलम 29अ हमीपत्र ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर प्रस्तुत करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | **शनिवार, ऑगस्ट 22, 2026, सायं. 5.00 (युटीसी+5.30)** |
| बयाणा रक्कम (ईएमडी) ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर प्रस्तुत करण्याचा अंतिम दिनांक आणि वेळ | **शनिवार, ऑगस्ट 22, 2026, सायं. 5.30 (युटीसी+5.30)** |
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | **मंगळवार, ऑगस्ट 25,2026 दुपारी 12.00 ते सायं. 6.00 (युटीसी+5.30)** |
| अंतिम विक्रीचे मूल्य भरण्याचा अंतिम दिनांक | खाली स्वाक्षरी करणारे यांच्याद्वारे अंतिम विक्री मूल्य भरण्याची मागणी करणारे पत्र जारी केल्याच्या साठ (60) दिवसांमध्ये |

| अनु. क्र. | रक्कम भारतीय रूपयांत | मालमत्ता आयडी | लिलाव आयडी | राखीव मूल्य* | बयाणा रक्कम (इएमडी) | बोली वाढीव मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता वर्णन - 200 चौ. मी. चा बिगरशेती निवासी प्लॉट, सर्वे क्र. 36/ए/प्लॉट/19 आणि युएलपीआयएन 14518756439, गाव पाली, ता. सुधागड, जि. रायगड,महाराष्ट्र, भारत येथे स्थित | 3144 | 3746 | 11,25,000 | 1,12,500 | 56,250 |

*विक्री पूर्ण होण्यासाठी लागणारे कर, अधिभार, चार्जेस, ड्युटीज, हस्तांतरण शुल्क, स्टँप ड्युटी, नोंदणी शुल्क, प्रिमियम आणि इतर सर्व लागू खर्च वगळून सर्व दर असून, त्याबाबत संबंधित एसएसपीएमच्या कलम १९ मध्ये (मूल्य, खर्च आणि कर परिणाम) नमूद केल्यानुसार खरेदीदाराने भरायचे आहेत. खाली स्वाक्षरी करणारे किंवा नुकसानभरपाईधारक पक्ष हे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व, हमी किंवा नुकसानभरपाई देत नाहीत (संबंधित एएसपीएम्समध्ये नमूद केल्याप्रमाणे)

**महत्वाच्या सूचना**

1. ही विक्री सूचना संबंधित एएसपीएमसहीत वाचावी, ज्यात मालमत्तांचे तपशील, उद्घोषणा, प्रतिज्ञापत्रे आणि आयबीसीच्या कलम 29ए अंतर्गत पात्रतेसाठी आवश्यक हमीपत्रे आणि ई-लिलावाच्या 'सर्वसाधारण आणि तांत्रिक अटी व शर्ती' बांकनेटवर **https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/auc-listing** वर वरील मालमत्तेच्या मालमत्ता आयडी आणि लिलाव आयडी उपलब्ध आहेत, किंवा कॉर्पोरेट कर्जदार यांच्या संकेतस्थळावर **www.jetairways.com** वर उपलब्ध आहेत.
2. इच्छुक बिडर्सनी संबंधित एएसपीएमएसमधील कलम 4 (पात्रता निकष दस्तावेज) नुसार, निश्चित केलेल्या कालमर्यादेत, आवश्यक पात्रता दस्तावेज आणि बयाणा रक्कम (इएमडी) केवळ आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच प्रस्तुत करावेत, थेट अवसायकाकडे प्रस्तुत करू नयेत.
3. ई-लिलाव प्लॅटफॉर्म आणि दस्तावेज आणि बयाणा रक्कम प्रस्तुत करण्यासंबंधी काही चौकशी करायची असेल, तर इच्छुक बिडर्सनी बांकनेट ला +91 8291220220 आणि **support.baanknet@psballiance.com** वर संपर्क करावा.
4. ई-लिलावासंदर्भात कोणतीही चौकशी करायची असेल तर अवसायक यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री. दर्शिल मशरू (+91 9594955294) यांच्याशी, jetliquidation@in.ey.com आणि **liquidation.jet@gmail.com** वर 'जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड मालमत्ता विक्री-पाली जमीन' असा विषय नमूद करून संपर्क साधावा. कृपया नोंद घ्या, पात्रता किंवा बोलीशी निगडीत कोणतेही दस्तावेज अवसायक, त्यांचे प्रतिनिधी किंवा त्यांचे सल्लागार यांच्याकडे प्रस्तुत करायचे नाहीत.
5. इथे स्पष्ट करण्यात येते की ही सूचना खाली स्वाक्षरी करणारे किंवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (अवसायनात) यांच्यावर विक्री पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन निर्माण करत नाही. खाली स्वाक्षरी करणारे यांनी सीओसी यांच्याबरोबर घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि तो सर्व इच्छुक बिडर्सवर बंधनकारक असेल.
6. इथे स्पष्ट करण्यात येते की इथे नमूद करण्यात आलेले आणि एएसपीएममध्ये नमूद करण्यात आलेले मालमत्तांचे तपशील हे केवळ सामान्य संदर्भासाठीच आहेत. नुकसानभरपाईधारक पक्ष (संबंधित एएसपीएममध्ये नमूद केल्याप्रमाणे) हे स्पष्टपणे मालमत्तांच्या वर्णनात/स्थितीत असलेल्या कोणत्याही वैगुण्य/चूक/विसंगती/चुकीचे निवेदन/वगळणे/बदल/दोष किंवा चूक, जरी अशी विसंगती ई-लिलाव पूर्ण होण्यापूर्वी, दरम्यान किंवा झाल्यानंतर निदर्शनास आली किंवा नाही तरी याबाबत कोणतेही उत्तरदायित्व घेणार नाही, असे स्पष्ट करतो. मालमत्तांची विक्री ही 'जे आहे जेथे आहे,' 'जे आहे ते आहे,' 'जे आहे जसे आहे,' आणि 'कोणत्याही मदतीशिवाय' आधारावरच आणि कोणत्याही प्रतिनिधीत्व, वॉरंटी किंवा नुकसानभरपाईशिवाय होणार आहे.
7. अंतिम विक्री मूल्याचा भरणा संबंधित एएसपीएममधील कलम 15 (अंतिम विक्री मूल्याचा भरणा) आणि 16 (विक्रीची पूर्णता) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादा, व्याजाच्या तरतुदी आणि जप्तीच्या अटींनुसार करावा.
8. अवसायक, कॉर्पोरेस्ट कर्जदाराच्या क्रेडीटर्स समितीच्या सल्ल्यानुसार, कोणतेही कारण न देता आणि लागू कायद्यानुसार अन्यथा अपेक्षित असल्याशिवाय, ई लिलाव प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा किंवा स्थगित करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

स्वाक्षरी/-
**सतिश कुमार गुप्ता**
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड चे अवसायक
आयपी नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र. - AA1/10056/02/311226/108454
एएफए वैधता डिसेंबर 31, 2026 पर्यंत
**ईमेल : liquidation.jet@gmail.com**

**दिनांक : 23.07.2026**
**स्थळ : मुंबई**

# आता दूध भेसळ केल्यास दहा लाखांचा दंड आणि कारवाई

### केंद्र सरकारची नवी नियमावली जाहीर; 'एफडीए'चा सर्जिकल स्ट्राईक

- घातक रसायनांची प्रयोगशाळेत तपासणी होणार
- दुधातील सूक्ष्म जीवाणूंचे प्रमाणही तपासणार




**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या दूध भेसळखोरांवर लगाम घालण्यासाठी राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. यांतर्गत दुधात भेसळ आढळल्यास किंवा अस्वच्छ वातावरणात दूध हाताळल्यास संबंधित विक्रेत्यांवर १० लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि कडक कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

'अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६'अंतर्गत भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने (एफएसएसएआय) दुधाची गुणवत्ता टिकवण्यासाठी आणि भेसळ रोखण्यासाठी नवी नियमावली व कठोर निकष लागू केले असून राज्याचे 'एफडीए' प्रशासन या नियमांची अंमलबजावणी करीत आहे. दुधाचे प्रमाण वाढवण्यासाठी केली जाणारी पाण्याची भेसळ तसेच दुधाला घट्टपणा आणण्यासाठी वापरले जाणारे युरिया, डिटर्जंट, कॉस्टिक सोडा, स्टार्च आणि फॉर्मेलिन यासारख्या घातक रसायनांची थेट प्रयोगशाळेत तपासणी केली जाणार आहे. याशिवाय, कृत्रिम (सिंथेटिक) दूध, जनावरांच्या औषधोपचारांमुळे दुधात येणारे प्रतिजैविकांचे अंश (अँटिबायोटिक्स) आणि सूक्ष्म जीवाणूंचे प्रमाणही तपासले जाणार आहे.

**ठळक संदेश छापणे बंधनकारक**

केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत लहान दूध विक्रेत्यांपासून ते मोठ्या डेअरींपर्यंत सर्वांना 'एफएसएसएआय'ची नोंदणी किंवा परवाना घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. सुट्या दुधाच्या कॅनवर 'कच्चे दूध-पिण्यापूर्वी उकळून घ्यावे,' असा स्पष्ट संदेश छापणे बंधनकारक आहे. तर, प्रक्रिया केलेले दूध सीलबंद पाकिटातच विकले पाहिजे. दूध संकलनापासून ते वितरणापर्यंत ठरावीक तापमान राखणे सक्तीचे करण्यात आले आहे.

> अन्न व औषध प्रशासन (एफडीए) महाराष्ट्र शासन हे केंद्र सरकारने दिलेल्या नियमावलीनुसार सध्या कारवाई करीत आहे. केंद्र शासनाच्या कायद्याप्रमाणेच दूध भेसळ करणाऱ्यांवर नजर ठेवली जात असून आतापर्यंत आमच्याकडे आलेल्या तक्रारीनुसार ही कारवाई होत आहे. काही दूध कंपन्यांच्या कागदपत्रांचीही तपासणी केली जात आहे.
>
> **- दिगंबर भोगावडे,**
> (सहआयुक्त, 'एफडीए' अन्न विभाग)

### जेनेरिक औषधांवर २०२८ पासून २०० टक्के आयात शुल्क; भारतीय कंपन्यांना सर्वाधिक फटका

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी (दि. २२) आणखी एक 'टॅरिफ बॉम्ब' टाकला. ऑगस्ट २०२८ पासून परदेशातून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या जेनेरिक औषधांवर भरमसाट आयात शुल्क (टॅरिफ) लादण्याची घोषणा ट्रम्प यांनी करून जगभरातील औषध निर्माता कंपन्यांना हादरा दिला.

**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**
**महापालिका सचिव विभाग**
**जाहीर प्रकटन क्रमांक ०२/२०२६-२७**

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विभाग मार्फत **महिला बचतगट खाजगी संस्था हॉटेल** यांचेकडून निविदेमधील खालील नमूद कामांसाठी ई-निविदा पध्दतीनुसार www.mahatenders.gov.in या वेबसाईटद्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नांव - महापालिकेच्या विविध बैठकीसाठी चहा, नाष्टा, जेवण व शीतपेय पुरवठा करणे र. रु.१३,७१,६००/-**

कामाबाबतची सविस्तर माहिती निविदा फॉर्म फी कामाची मुदत शासन निर्णयाप्रमाणे दर निविदा विक्री व स्वीकारणे तसेच निविदा उघडणे व अन्य वेळापत्रक निविदा निहाय माहिती www.mahatenders.gov.in संकेत स्थळावर सविस्तर देणेत आलेली आहे.

७) संपूर्ण निविदा प्रक्रिया अर्ज विक्री सादरीकरण व स्वीकृती E- Tender System द्वारे कार्यरत राहील.
४) निविदा ऑनलाईन प्रसिध्दी - **दि. २३/०७/२०२६**

Sd/- आयुक्त
सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका

जा.क्र.मनपा/मसवि/१६२/२०२६-२७, दि.२२/०७/२०२६
सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका.